NAVJYOT / Vol. XI / Issue – I ISSN 2277-8063

# राजर्षी शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर :पुरोगामी विचारांचे आधारस्तंभ

**श्री. अनिल पोपट लोखंडे** सहाय्यक प्राध्यापक,राजे रामराव महाविद्यालय, जत जि.सांगली.मोबाईल:९९६०७९७४४४ ई -मेल : lokhandeanil143@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

भारतमातेच्या पोटी जन्म घेतलेल्या गौतम बुद्ध, चार्वाक, संत कबीर, संत तुकाराम महाराज, छ. शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख अशा अनेक थोरांनी, संतांनी, राजांनी, महाराजांनी आणि समाज सुधारकांनी जन्म घेऊन भारतातील गोरगरीब दीन दुबळ्यांची, अस्पृश्यांची, धर्मांध शक्तीच्या जोखडातून मुक्तता करून समतेचा स्वीकारलेला मार्ग हा मानवमुक्तीसाठीचा न्यायिक मार्ग आहे. हे जगाला दाखवून दिले आहे.

महाराष्ट्राची भूमी ही महापुरुषांची, संतांची, समाजसुधारकांची जननी आहे. या भूमीतील समाज सुधारकांनी आपल्या कार्यातून सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. फुले, शाहू, आंबेडकर हे पुरोगामी महाराष्ट्राचे प्रेरणास्रोत आहेत.

ज्या काळात भारत देश पारतंत्र्यात होता स्वातंत्र्य मिळावे अशी आस किंवा भावना प्रत्येक भारतीयाच्या मनात जागृत झाली होती. त्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्यांचा जन्म झाला ते महापुरुष म्हणजे राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात फार जोमाने उमटवलेला आपणास दिसून येत आहे.

मानवी जीवनाच्या विकासाचे असे एकही क्षेत्र नाही की ज्यासाठी या महापुरुषांनी काम केले नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वावर आधारित सामाजिक बांधिलकीचे स्वप्न उराशी बाळगून अस्पृश्य, बहुजन समाजाच्या मानव मुक्ती साठी आयुष्य खर्ची घालणारे ध्येयवेडे महापुरुष होते.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जनहितार्थ घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाच्या जोरावर अखिल मानवजातीच्या गळ्यातील ताईत बनले आणि दैदिप्यमान अशा कार्यकर्तृत्वाच्या बळावर जगासमोर एक आदर्श निर्माण करून आकाशाला गवसणी घातली. शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे जिव्हाळ्याचे संबंध इतके झाले होते की ते व्यक्त करण्यासाठी शब्द ही अपुरे पडतात.

**महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अपूर्व घटना-**

शाहू महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांची भेट आणि त्यानंतर घडून आलेला परस्परातील सहयोग ही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अपूर्व घटना होती. महाराष्ट्र राज्यासह विशेषतः संपूर्ण भारताचे दुर्दैव असे होते की हा योग फार काळ टिकू शकला नाही.महाराजांच्या अकाली निधनामुळे तो संपुष्टात आला.

शाहू महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांना दीन- दलितांबद्दल असणारी कणव आणि सामाजिक व्यथा याबद्दल जाणीव हा समान धागा होता. मात्र बाबासाहेबांनी शाहू महाराजांच्या

स्वप्नातील समाज निर्मितीच्या प्रक्रियेला खूप मोठ्या ताकतीने वास्तवात उतरविण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला आणि ते स्वप्न साकार करून दाखविले.

**शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांची भेट एक अनोखा प्रसंग–**

कोल्हापुरातील अस्पृश्य समाजातील सुशिक्षित कार्यकर्ते दत्तोबा संतराम पोवार यांचा बाबासाहेबांशी अगोदरच सन १९१७ पासून परिचय होता. शाहू महाराज यांच्या इच्छेप्रमाणे बाबासाहेब यांची भेट मुंबईतील परळ भागातील चाळीमध्ये दत्तोबा पोवार यांच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या राहत्या घरी प्रथम घडून आली होती.

या दोन महापुरुषांच्या भेटीच्या या कालखंडात बाबत इतिहासकार व अभ्यासक यांच्यामध्ये मतभेद असले तरी, ही भेट १९१९ साली घडून आली असावी असे ग्राह्य धरले आहे.

भेटीनंतर पन्हाळा लॉजवर या दोन महापुरुषांची प्रदीर्घ अशी चर्चा झाली आणि महाराजांनी बाबासाहेबांना कोल्हापूरला येण्याविषयी निमंत्रण दिले.ते बाबासाहेबांनी आनंदाने स्वीकारले.

**बाबासाहेबांची कोल्हापूर भेट–**

शाहू महाराजांनी दिलेल्या निमंत्रणाचा स्वीकार करून ठरल्याप्रमाणे बाबासाहेब कोल्हापूरला आले.कोल्हापूर मध्ये रेल्वे स्टेशन समोर असलेल्या तेव्हाच्या विश्रामगृहात विश्रांतीची व वास्तव्याची सोय केली होती.महाराजांनी बाबासाहेबांचे स्वागत करून कोल्हापूर शहरातून मिरवणूक काढली आणि पाहुणचार हा मनःपूर्वक राजेशाही थाटात केला होता.

**मूकनायक हे मोठे अन्वयार्थक नाव दिले–**

शाहू महाराजांनी बाबासाहेबांना वृत्तपत्र काढण्यासाठी अर्थसाहय म्हणून रक्कम २५०० रुपये इतकी दिली होती.शतकानुशतके मुका बनून राहिलेल्या बहिष्कृत समाजात जागृती निर्माण करून त्यांचे नेतृत्व करू इच्छिणाऱ्या आपल्या वृत्तपत्रास बाबासाहेबांनी 'मूकनायक ' हे नाव देऊन त्यास अस्पृश्य व वंचित बहुजन समाजाचा आवाज बनवला.

**माणगाव परिषदेमधून महाराजांनी बाबासाहेबांच्या नेतृत्वाची घोषणा–**

छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वाखाली २१ व २२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर संस्थानातील कागल जहागिरीत असलेल्या माणगाव या ठिकाणी अस्पृश्यांची दक्षिण भारतातील पहिली ऐतिहासिक परिषद शाहू महाराजांच्या प्रेरणेने भरली होती.शाहू महाराजांना परिषदेचे अध्यक्ष असलेल्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने अस्पृश्य समाजात एक उमदे नेतृत्व मिळाले याचा मनस्वी आनंद महाराजांना होता.

तो व्यक्त करताना महाराजांनी म्हटले होते, "तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला ह्याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.माझी खात्री आहे की, डॉ.आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत, इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. हे माझी मनोदेवता मला सांगते".

याच परिषदेत शाहू महाराजांबद्दल बाबासाहेबांनी काढलेले उदगार "आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे राज्य हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य आरंभील्याबद्दल अभिनंदन करून महाराजांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा असा ठराव मंजूर केला ".माणगाव परिषद एकूण १५ ठराव मांडले आणि ते पास

झाले.इतिहासाने हे दाखवून दिले आहे की शाहू महाराजांनी आपल्या दूर दृष्टीने बाबासाहेबांविषयी केलेले भाकीत अचूक होते, यात तिळमात्र शंका नाही.

**सहभोजनाचा कार्यक्रम आणि 'जरीपटक्या 'चा प्रेमाचा आहेर –**

माणगाव परिषदेच्या कार्यक्रमात शाहू महाराजांनी बाबासाहेबांना आपल्याकडे भोजनाचे जाहीर निमंत्रण दिले.त्याप्रमाणे महाराजांनी सोनतळी कॅम्पवर सहभोजनाचा जंगी कार्यक्रम घडवून आणला होता.कोल्हापूरच्या या भेटीत महाराजांनी बाबासाहेबांना मोठ्या सन्मानाने वागविले व शेवटी निरोप देतेवेळी कोल्हापुरी 'जरिपटक्या 'चा प्रेमाचा आहेरही केला.

हा आहेर स्वीकारताना बाबासाहेबांना गहिवरुन आले आणि ती उदगारले ,"छत्रपतींनी मानाचा 'जरीपटका' माझ्या मस्तकी चढवला त्याचा सदैव मी मान राखीन आयुष्यभर दलित उद्धाराचे कार्य करून बाबासाहेबांनी छत्रपतींच्या 'जरीपटक्या' चा मान राखला असेच, त्यानंतरचा इतिहास आपणास सांगतो ".

**नागपूर परिषद –**

"अखिल भारतीय बहिष्कृत समाजा "ची पहिली परिषद नागपूर येथे ३०,३१ मे आणि १जून १९२० याप्रमाणे तीन दिवस शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाली होती. या परिषदेचे अध्यक्ष पद शाहू महाराजांनी स्वीकारावे यासाठी ग. आ. गवई, केशवराव खंडारे, कालीचरण नंदागवळी यांनी कोल्हापुरात जाऊन महाराजांना विनंती केली होती.त्यांच्या या विनंतीला मान देऊन महाराज स्वतः या परिषदेला उपस्थित राहिले.महाराजांनी या अस्पृश्यता निर्मूलनाच्या चळवळीत सर्व स्वानिशी स्वतःला झोकून दिले होते अस्पृश्यता निवारणाच्या दिशेने उचलेले हे ऐतिहासिक पाऊल होते.

<u>म्हणूनच महाराजांच्या वर चौफेर टीका झाली–</u>

<u>राजकारण</u>– या वृत्तपत्रातून लिहिले होते की " अस्पृश्यांच्या हातचा चहा घेणे ही खरोखरच मोठ्या पराक्रमाची बाब आहे, असे समजू नये. आपल्या गादीचा त्या करू असे त्यांनी भाषण केले पण, आपण आपल्या गादीचा वारस ते महार म्हणून निवडणार आहेत काय ?".

<u>लोकसंग्रह–</u> या साप्ताहिकाने " कोल्हापूर राज्यातील भानगडींची चौकशी करावी. अशी सरकारला विनंती केली ?"

शाहू राजांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य चालविल्याने महाराष्ट्रातील केसरी सह इतर अनेक ब्राह्मणी वृत्तपत्रांचे त्यांच्यावर हल्ले कठोर बनत चालले होते. पण महाराज निधड्या छातीचे आणि धाडसी होते त्यामुळे अशा गोष्टींन पुढे ते नमले नाहीत, खचले नाहीत, उलट त्यांनी नव्या ईर्षेने अस्पृश्यांच्या चळवळीला सर्वोतपरी मदत करण्याची भूमिका ठाम ठेवली इतकेच नव्हे तर कृतीशिलतेचे एक पाऊल धैर्याने नेहमी पुढे टाकले.

**महापुरुषांमध्ये (उभयंतात) सल्ला – मसलत–**

महाराज आणि बाबासाहेब यांच्या वयात १६ ते १७ वर्षाचे अंतर होते.पण त्याकडे दोघांनीही कधी लक्ष दिल्याचे जाणवत नाही.महाराजांनी बाबासाहेबांच्या वयापेक्षा त्यांच्या विद्वत्तेचा आणि त्यांच्या मनात असलेल्या अस्पृश्यांच्या बद्दलच्या तळमळीचा विचार केला होता.

म्हणूनच माणगावच्या परिषदेत महाराज बाबासाहेबांना उद्देशून म्हणाले," माझे प्रिय मित्र आंबेडकर" असे म्हणाले होते, तर बाबासाहेब महाराजांना "अस्पृश्यांच्या सखा " असे म्हणाले होते. या ठिकाणी प्रश्न कोण कोणाला काय म्हणाले हा नाही तर दोघांत किती

जवळीक, जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते हा आहे. त्यामुळेच दोघात मुक्तपणे चर्चा होत असे.

सन १९२० मध्ये अस्पृश्य वर्गापैकी कोणीतरी महाराजांकडे मदतीची याचना करणारा अर्ज केला होता. तो अर्ज महाराजांनी अभिप्रायासाठी बाबासाहेबांकडे पाठविला होता.ह्यावरून महाराज काही बाबतीत तरी विचार विनिमय करीत असावेत असे दिसून येते.

दरम्यान महार लोक गुन्हेगार आहेत असे टिळक यांनी एका सभेत उदगार काढले होते. शिवाय टिळकांच्या अनुयायांनी सार्वजनिक फंडातील पैशाची अफरातफर केल्याच्या आरोपाच्या संदर्भात टिळकांच्या विरोधात आपल्याला कायदेशीर इलाज करता येईल की, नाही याबद्दल बाबासाहेबांनी मुंबईतील मेसर्स लिटल अँड कंपनी शी चर्चा करावी अशा अर्थाचे पत्र महाराजांनी बाबासाहेबांना लिहिले होते ते असे.

यावर उत्तर दाखल लिहिलेल्या पत्रात हे प्रकरण हाती घेतले तर त्यात आपणाला फार त्रास होईल व त्या मानाने निष्पन्न काही होणार नाही असे बाबासाहेबांनी महाराजांना कळविले होते.

वरील सर्व घटना लक्षात घेतल्या तर महाराज आणि बाबासाहेब यांच्यात अनेक महत्त्वाच्या गोष्टींबद्दल विचार – विनिमय आणि सल्ला– मसलत होत असे हे स्पष्टपणे दिसून येते.दोघांनीही एकमेकांना सर्व काही सांगण्याचे आणि एकमेकांना सावरण्याचे परस्पर ठरविले होते हेही दिसून येते.

**शाहू महाराजांना बाबासाहेबांची तीन पत्रे–**

सन १९२०–२१ दरम्यान बाबासाहेबांनी शाहू महाराजांना लिहिलेली तीन पत्रे आहेत. ही पत्रे शाहू महाराजांचे मार्गदर्शक व सल्लागार दिवाण सबनीस यांच्या खाजगी दप्तरात आढळून आली आहेत.

१) मुंबईच्या ' मूकनायक ' च्या कार्यालयातून पत्र लिहिले असून याचा आशय– शाहू महाराज नागपूरच्या परिषदेला येणार असल्याचा आनंद व्यक्त केला आहे.

२) ६ ऑक्टोबर १९२१ रोजी लंडनहून लिहिले आहे याचा आशय – बाबासाहेबांनी शाहू महाराज यांचे ऋण व्यक्त केले व आर्थिक अडचण असल्याने २००पौंड मदतीची विनंती केली.

३) २० ऑक्टोंबर १९२१ ला हे पत्र लंडनहून लिहिले असून याचा आशय – शाहू महाराजांनी पाठवलेली रक्कम मिळाल्याचे नमूद केले आहे.

या पत्रांमधून व्यक्त झालेले जिव्हाळ्याचे संबंध व वैयक्तिक आणि वैचारिक एकमेकांना असणारा पाठिंबा दिसून येतो.

**शाहू महाराजांच्या निधनाने बाबासाहेब व्याकुळ झाले. त्यानंतर महाराजांच्या कुटुंबीयांशी त्यांचा वाढता सहयोग –**

बाबासाहेबांनी राजाराम महाराजांना १० मे १९२२ रोजी लंडनहून एक शोकाकुल पत्र लिहिले होते. या पत्राचा आशय – " येथील वर्तमान पत्रात महाराजांच्या मृत्यूची बातमी वाचून मला मोठा धक्का बसला. ही संकटाची घटना दोन कारणांमुळे दुःखदायक झाली आहे.त्यांच्या मरणाने मी एका वैयक्तिक मित्राला आचावलो आणि अस्पृश्य समाज आपल्या हितचिंतकाला व सर्वात महान कैवाऱ्याला मुकला आहे".

मी स्वतः दुःखाने व्याकुळ झाले असताना, आपल्या व विधवा महाराणीसाहेबांच्या अपार दुःखात कळकळीची सहानुभूती व्यक्त करीत आहे. बाबासाहेब लंडनहून भारतात

आल्यावर स्वतः राजाराम महाराज आणि महाराणीसाहेब यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे सांत्वन करण्यासाठी कोल्हापुरात आले होते.

**शाहू महाराजांबद्दल बाबासाहेबांचे गौरवोद्गगार–**

१३ जानेवारी १९४० रोजी कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या ' दलित प्रजा परिषदे ' च्या अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब म्हणाले होते – " कोल्हापूर संबंधी एक गोष्ट अगदी निश्चित आहे व या गोष्टीबद्दल अस्पृश्यांना व मला कोल्हापूरचा अभिमान वाटतो. शाहू महाराजांनी कोल्हापुरातच खरी लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली ही ती गोष्ट होय"

**ऋणानुबंध –**

ज्या अदृश्य धाग्याने नाती विणली जातात त्याचे पोषण प्रेम आणि विश्वासावर होत असते. शाहू महाराज आणि बाबासाहेब यांच्यातील ऋणानुबंध असे होते. तसे ते दोघेही असामान्य मात्र व्यवस्थेने दोघांवरती जात– धर्माचा शिक्का मारलेला.पण दोघेही जात–धर्माच्या पलीकडे गेलेले महापुरुष होते.

शाहू महाराज एका संस्थानाचे राजे होते तर बाबासाहेब एका अस्पृश्य कुटुंबात जन्माला आले होते; त्यांनी घेतलेले उच्च शिक्षण आणि त्यांची विद्वत्ता ही एक त्यांच्या अनेक गुणांपैकी एक जमेची बाजू होती. पण तरीही जात त्यांच्या सतत आडवी येत होती.बालपणापासूनच जातीयतेचे चटके सहन केलेल्या बाबासाहेबांनी स्वानुभवाने आपल्या बांधवाची दुःख, प्रश्न जाणून घेतले आणि उभे आयुष्य त्यांच्यासाठी खर्ची घातले.

शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या आधीच अस्पृश्यांच्या मुक्तीची चळवळ सुरू केली होती. महाराजांच्या निधनानंतर या चळवळीचे सूत्र बाबासाहेबांच्या हाती आली. बाबासाहेबांचे नेतृत्व उदयास आले आणि चळवळ स्थिर होऊ लागली.यासाठी त्यांना महाराजांचा खरा पाठिंबा आणि आधार मिळाला होता.या आधारामुळे बाबासाहेब बरीच पावले पुढे टाकू शकले.

समतेच्या पायावर समाज उभा करण्यासाठी महाराजांचे स्वप्न साकार करण्यासाठी बाबासाहेबांच्या रूपाने एक तरुण,तडफदार पुढारी अस्पृश्यांना मिळाला आणि महाराजांची स्वप्नपूर्ती झाल्याचे या देशाने पाहिले. पण हे वैभव पाहवयास दुर्दैवाने महाराज हयात नव्हते.

महाराज जर आणखी काही वर्ष जगले असते तर दोघांचे अस्पृश्योद्धाराचे, सामाजिक सुधारणा चळवळीचे आणखी वेगळे चित्र जगाला पाहायला मिळाले असते; पण बाबासाहेब थांबले नाहीत त्यांनी महाराजांच्या संकल्पनेतील अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचले आणि ते करत असताना त्यांनी महाराजांचे ऋण ही मान्य केले.

बाबासाहेब लंडनला असताना महाराजांनी जसा बाबासाहेबांच्या विचार कार्याचा ठसा अस्पष्ट होऊ दिला नाही, उलट तो अधिकच ठळक करून ठेवला त्याचप्रमाणे महाराज हयात नव्हते तरी त्यांच्या पश्चात बाबासाहेबांनी त्यांच्या विचार–कार्याची परंपरा तर पुढे चालू ठेवली. पण कधी अस्पष्ट होऊ दिली नाही उलट ती अधिक ठळक केली. दोघांच्या बाबतीत हे घडले त्याचे प्रमुख कारण म्हणजे दोघातील अतूट असे ऋणानुबंध हेच होय.

**सारांश –**

शाहू महाराज यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या संस्थानात सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, १९०२ साली मागासलेल्या जातींसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले, गुन्हेगारी जमातींची हजेरी बंद, वेठबिगारी बंद, कोल्हापुरात वसतिगृहाची निर्मिती, अस्पृश्यता

पाळण्यावर बंदी, शेती, उद्योग, सहकार, बाजारपेठांचा निर्मिती, कुस्तीसाठी राजाश्रय आणि शाहू मैदानाची निर्मिती यासारखे अनेक महत्त्वपूर्ण असे ऐतिहासिक निर्णय घेऊन मानवमुक्तीचा, समाज प्रबोधनाचा आणि विकासाचा पाया रचला. यासारख्या वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्य हे मैलाचे दगड बनले आहेत. महाराजांच्या विचारांनी देशाच्या उभारणीसाठी एक आधारस्तंभच्या रूपाने भूमिका बजावली आहे.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केलेल्या कायद्यांना बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या निर्मिती प्रक्रियेवेळी ह्या कायद्यांना आदर्श मानून लोककल्याणकारी राज्याची प्रस्थापना भारतीय संविधानात केली आहे.

शाहू महाराजांचे विचार व कार्य हे आदर्शाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून वैभवाच्या शिखरावर नेऊन महाराजांच्या कार्याला खऱ्या अर्थाने संवैधनिक न्याय मिळवून दिला आहे. त्यांनी केलेल्या सहकार्याची, उपकाराची, उतराई याशिवाय दुसरी काय असू शकते.

**संदर्भ सुची-**

१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संपादक - डॉ. जयसिंगराव पवार. प्रथम आवृत्ती - २००१
२) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, संपादक - प्रा. डॉ. रमेश जाधव
महाराष्ट्र शासन - राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती - मुंबई - ४०००२१, सुधारित तिसरी आवृत्ती -२०१६.
३) राजर्षी शाहू छत्रपती - धनंजय कीर ,पॉप्युलर प्रकाशन- दुसरी आवृत्ती - १९९२.
४) राजर्षी शाहू- एक दृष्टिक्षेप - डॉ. जयसिंगराव पवार, मंजुश्री प्रकाशन ,कोल्हापूर.
५) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर -
खंड-१ चांगदेव भगवानराव खैरमोडे , चौथी आवृत्ती - १९९२.
खंड-२ चांगदेव भगवानराव खैरमोडे, सुगावा प्रकाशन, पुणे (द्वितीय आवृत्ती - १९९१)